**महाराष्ट्र शासन,**
**पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई**

जा.क्र. प्लास्टीक 2018/प्र.क्र.101/तां.क.4 दिनांक : १०/०७/२०१८.

**परिपत्रक**

महाराष्ट्र विघटनशील व अविघटनशील कचरा नियंत्रण कायदा २००६ च्या कलम ४ ची पोटकलमे (१) व (२ ) याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराअंतर्गत महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र प्लॅस्टीक व थर्मोकॉल अविघटनशील वस्तुंचे (उत्पादन, वापर, विक्री, वाहतूक, हाताळणी, साठवणूक) अधिनियम २०१८ दि. २३ मार्च २०१८, सुधारित ११ एप्रिल २०१८ व ३० जून २०१८ रोजी अधिसूचीत केले आहेत. सदर अधिसूचनेनुसार बंदी असलेल्या व बंदी नसलेल्या प्लॅस्टीक व थर्मोकॉल वस्तुबाबत सर्वसामान्य् जनतेला मार्गदर्शन करण्यासाठी उदाहरण वजा सचित्र माहिती पुस्तीका प्रसिध्द करण्यात येत आहे. या परिपत्रकासोबत सदर सचित्र माहिती पुस्तीका जोडली आहे.

सदर अधिसूचना व सचित्र माहिती पुस्तीका महाराष्ट्र शासनाचे पर्यावरण विभाग व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध् आहेत.

(अनिल डिग्गीकर)
प्रधान सचिव (पर्यावरण)

सत्यमेव जयते

पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन

http://mahenvis.nic.in

महाराष्ट्र

महाराष्ट्र प्रदूषण
नियंत्रण मंडळ

http://mpcb.gov.in



मा. ना. श्री. देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य



मा. ना. श्री. रामदास कदम
मंत्री, पर्यावरण



मा. ना. श्री. प्रवीण पोटे पाटील
राज्यमंत्री, पर्यावरण

# प्लास्टीक पिशवी आणि थर्माकोल मुक्त महाराष्ट्र जनजागृती अभियान २०१८

# सचित्र मार्गदर्शिका

एकच ध्यास ठेवूया, प्लास्टीक पिशवी हटवूया,
समृद्ध पर्यावरणाचे रक्षण करूया!

# बंदी आहे

**२०० मिलि पेक्षा कमी द्रव धारण क्षमता असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या पीईटी व पीईटीई बाटल्या**



# बंदी आहे

**पिण्याच्या पाण्याची पिशवी.**




# बंदी नाही

**२०० मिलि व त्यापेक्षा जास्त द्रव धारण क्षमता असलेल्या पीईटी व पीईटीई बाटल्या.**



पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# बंदी आहे

## सर्व प्रकारच्या प्लास्टीक पिशव्या.
## (हॅन्डल असलेल्या व नसलेल्या)



प्लास्टीक पिशवी



नॉन वोवन बॅग्ज् (पॉलिप्रॉपीलीन)



प्लास्टीक/नॉन वोवन शॉपिंग बॅग्ज्

# बंदी आहे

थर्माकोल (पॉलिस्टायरिन) व प्लास्टीक पासून बनविण्यात येणाऱ्या व एकदाच वापरल्या जाणाऱ्या डिस्पोजबल वस्तु, उदा. ताट, कप्स्, प्लेटस्, ग्लास, काटे, वाटी, चमचे, भांडे इत्यादी.



# बंदी आहे

हॉटेल्समध्ये अन्नपदार्थ पॅकेजींगसाठी वापरले जाणारे प्लास्टीकचे भांडे व वाटी तसेच स्ट्रॉ.





पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

## बंदी नाही

**विशेष आर्थिक क्षेत्र, निर्यातीसाठी विविक्षित उद्योग इत्यादीमध्ये फक्त निर्यातीसाठी वापरलेजाणारे प्लास्टीक आवरणाचे उत्पादन.**



## बंदी नाही

**उप्पादनाच्या ठिकाणी, उत्पादनाच्या प्रक्रियेदरम्यान अनिवार्य वेष्टनसाठी वापरण्यात येणारे ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीचे व २० टक्के पुनर्चक्रीत प्लास्टीकपासून बनवलेले प्लास्टीक/थर्माकोलचे आवरण व त्यावर पुनखरेदी किंमत व उत्पादकाचे नाव.**





# बंदी नाही

## किरकोळ व घाऊक अन्नधान्य व किराणा माल
## सिलबंद प्लास्टीक पॅकेजिंग/आवरण की जे ५० मायक्रॉनपेक्षा
## जास्त जाड व दोन ग्रॅमपेक्षा जास्त वजनाचे
## तसेच त्यावर पुनखरेदी किंमत व उत्पादाचे नाव.













पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# बंदी आहे

**वन, फलोत्पादन, कृषी, घनकचरा या व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची कंपोस्टेबल प्लास्टीक पिशवी.**




# बंदी नाही

**वन, फलोत्पादन, कृषी, घनकचरा या प्रयोजनासाठी लागणारी कंपोस्टेबल प्लास्टीक पिशवी.**





पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# बंदी नाही

## प्लास्टीकचा एक थर असलेला पुठ्ठा किंवा खोका





# बंदी नाही

## दुधाच्या पॅकेजिंगसाठी वापरण्यात येणारी ५० मायक्रॉनपेक्षा जास्त जाडीची प्लास्टीक पिशवी व त्यावर पुनखरेदी किंमत व उत्पादकावे नाव.





## बंदी नाही

### पुनर्चक्रण होणारे मल्टीलेअर पॅकेजिंग.










चिप्स पॅकेट, शॅम्पू सॅशे, तेल पॅकेट, चॉकलेट पॅकेट इत्यादी

## बंदी नाही

### घरगुती वापराची प्लास्टीक उत्पादने







## बंदी नाही

**औषधांचे वेष्टन, वैद्यकीय उपकरणे आणि वैद्यकीय उत्पादनांसाठी वापरण्यात येणारे प्लास्टीक.**



## बंदी आहे

**प्लास्टीक व थर्माकोलचा वापर सजावटीसाठी बंदी असेल.**



## बंदी नाही

**मत्स व्यवसायात मासे टिकवून ठेवण्यासाठी वापरले जाणारे थर्माकोल बॉक्स**



पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# बंदी नाही

## पुनर्चक्रण होणारी
## शैक्षणीक व कार्यालयीन उपयोगाची प्लास्टीक स्टेशनरी उत्पादने






# बंदी नाही

## अन्य प्लास्टीक उत्पादने







पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ



# प्लास्टीक व थर्माकोल बंदी अंतर्गत गुन्हा केल्यास दंड :

पहिला गुन्हा रु. ५००० दंड

दुसरा गुन्हा रु. १०००० दंड

तिसरा गुन्हा रु. २५००० दंड + ३ महिने कारावास

विशेष सूचना :

सदर पत्रकातील सचित्र माहिती ही उदाहरणवजा असून संपूर्ण माहितीकरिता पर्यावरण विभाग व महाराष्ट्र शासन यांनी प्लास्टीक व थर्माकोल बंदीबाबत दि. २३ मार्च २०१८, दि. ११ एप्रिल २०१८ व दि. २ जुलै २०१८ या दिवशी प्रसिद्ध केलेली अधिसूचना http://mahenvis.nic.in, http://mpcb.gov.in व https://dgps.maharashtra.gov.in वर उपलब्ध आहे.

